# समर्थ सहकारी बँक मर्यादित, जालना

**मुख्य कार्यालय: पहिला व दुसरा मजला, प्लॉट नं.३५०/१५७, गणेश जिनिंग, जुना मोंढा, जालना -४३१ २०३**

दि.२७/०८/२०२३

जावक क्रं.२०२३-२४/२३६

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त बँकेच्या सभासदासाठी)**

बँकेच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, बँकेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **वार रविवार दि.१७/०९/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता झंवर मंगल कार्यालय, घनसावंगी रोड, अंबड जि.जालना** येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्याकरिता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय :-**

१) मागील दि.२५/०९/२०२२ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

२) दि.३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा मा.संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल लेखापरिक्षीत ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.

३) सन २०२२-२०२३ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण व दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.

४) मा.संचालक मंडळाने शिफारस केल्या प्रमाणे नफ्याच्या वाटणीस मंजुरी देणे.

५) अ) सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रका पेक्षा कमी किंवा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

ब) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६) अ) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता नियुक्त समवर्ती लेखापरीक्षक (Concurrent Auditor) व त्यांच्या मेहनतानास मंजुरी देणे.

ब) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता नियुक्त कर लेखापरीक्षक (Tax Auditor) व त्यांच्या मेहनतानास मंजुरी देणे.

क) बँकेच्या संचालक मंडळ सभा दि.२१.४.२०२३ ठराव क्रमांक (१४) अन्वये,सन २०२३-२०२४ या वर्षासाठी सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांच्या पॅनलवरील यादी मधील वैधानिक लेखा परिक्षकाची (Statutory Auditor) नेमणुक करणे व त्यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.आर.बी.आय.यांना शिफारस करणे.

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम २६(२) (अ) परिच्छेद क्रं.२ प्रमाणे सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे बाबत.

८) मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ :- जालना

दिनांक :- २७/०८/२०२३

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**आर.डी.गेही**

मुख्य कार्यकारी अधिकारी

**-: सभासदांना विनंती :-**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२) सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस येतांना आपल्या अहवालाची प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

३) कोणत्याही सभासदांस काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सभेच्या तारखे पुर्वी ७ दिवस अगोदर बँकेच्या मुख्य कार्यालयात कृपया लेखी सादर करावेत.

४) बँकेच्या पोटनियमानुसार सन २०२२-२३ चे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद व रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार इतर डिस्क्लोजर्स व अहवाल बँकेचे मुख्य कार्यालय व शाखा येथे नोटीस बोर्डावर लावलेले आहेत.

५) २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील विषयासंबधी काही सुचना अथवा चौकशी करावयाची असल्यास लेखी स्वरुपात दि.०८/०९/२०२३ पूर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयाला अर्ज करावा.

६) रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सभासदांनी केवासयी संबंधित कागदपत्रे शाखेकडे दाखल करावीत.

७) नजरचुकीने तांत्रिकदृष्ट्या अहवालात काही त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.सभासंदानी अशा बाबी कृपया क्षम्य कराव्यात.